लोकमत

# कृषी हा देशाचा कणा, पण त्यावरील आजही संकटाची मालिका सुरूच

## डॉ. पंकज भोयर : यात्री निवास येथील प्रशिक्षण, अभ्यास कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** कृषी हा देशाचा कणा असून, कृषी व शेतकऱ्यांवर संकटांची मालिका सुरूच आहे. याही परिस्थितीत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची कर्मभूमी राहिलेल्या वर्धा येथून बजाज फाउंडेशन पाण्याचे योग्य व्यवस्थापन या विषयावर काम करीत आहेत. ही कौतुकाचीच बाब आहे, असे प्रतिपादन आ. डॉ. पंकज भोयर यांनी केले.

बजाज फाउंडेशन व विश्व युवक केंद्र दिल्लीच्या संयुक्त विद्यमाने सेवाग्राम आश्रम भागातील यात्री निवास येथे आयोजित पाणी व्यवस्थापन व शेती आधारित उद्योग या विषयावर प्रशिक्षण आणि अभ्यास कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर बजाज फाउंडेशनचे अध्यक्ष हरीभाई मोरी, विश्व युवक केंद्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी उदय शंकर सिंग, जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. आ. डॉ. भोयर पुढे म्हणाले, कृषी उत्पन्न आणि पाणी हा महत्त्वाचा घटक आहे. जिल्ह्यात तामसवाडा प्रकल्प चांगल्या प्रकारे माधव कोटस्थाने यांनी राबविला. त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. शेती आणि शेतकरी संकटात असल्याने हे अभियान लोक अभियान व्हायला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी केली. आभार बजाज फाउंडेशनचे जावेद रिझवी यांनी मानले. चार दिवसीय शिबिरात महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओडिशा, दिल्ली, उत्तराखंड, राजस्थान आदी राज्यातील प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.




मार्गदर्शन करताना आमदार डॉ. पंकज भोयर, व्यासपीठावर उपस्थित हरीभाई मोरी, उदय शंकर सिंग, माधव कोटस्थाने व अन्य मान्यवर.

### शेतकरी निराश होतो, उद्योजक नाही : उदय शंकर सिंग

- उद्योजक निराश होत नाही. पण, शेतकरी मात्र निराश होतो. उत्पादन वाढले तर योग्य मूल्य मिळत नाही.
- नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून उत्पादन वाढून मूल्य कसे मिळविता येईल यासाठी योजना बनविणे तसेच शेतकऱ्यांनीही बाजार भावाबाबत जागरूक होणे गरजेचे असल्याचे याप्रसंगी उदय शंकर सिंग यांनी सांगितले.

### पारंपरिक शेतीत बदल गरजेचा : हरीभाई मोरी

- पारंपरिक पद्धतीच्या शेतीमध्ये बदल करावा लागेल. बजाज फाउंडेशनच्या माध्यमातून पाणी आणि कृषी, उद्योग क्षेत्रात चांगले काम होत आहे. आपल्यासमोर अमूलचे उदाहरण आहे.
- फक्त आपल्याला चांगल्या व्यासपीठाची गरज आहे. ती शोधावी लागणार. दहा वर्षांत परत खेड्याकडे वळावे लागेल. शेती हाच एकमेव आधार ठरणार आहे, असे हरीभाई मोरी यांनी स्पष्ट केले.

### पाण्याच्या संदर्भात भौगोलिक, उपलब्ध साधनांचा अभ्यास आवश्यक : कोटस्थाने

आपण स्वत:ला जलतज्ज्ञ नाही तर जलसेवक मानतो. तामसवाडा येथे शास्त्रीय पद्धतीने कामे झाल्याने सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. पाण्याच्या संदर्भात भौगोलिक आणि उपलब्ध साधनांचा अभ्यास आवश्यक आहे, असे जलतज्ज्ञ माधव कोटस्थाने यांनी सांगितले.